# Outcomes: 01



**Miss. Sumitra Raut**

**Ex-NSS Volunteer**

**Worked as Sarpanch**
(Head of a Panchayat)

**At Gram Panchayat, Bopkhel , Tal. Sakri**

## Outcomes: 01

**Miss. Sumitra Raut (NSS) in association with village panchayat has started Vachan Katta (Reading Forum) in the adopted village Bopkhel to enhance the reading habits of the villagers.**

**https://public.app/s/ab19a**



बोपखेल (ता. साक्री) : कवयित्री बहिणाबाई ग्रामवाचन कट्ट्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे.

### ग्रामवाचन कट्ट्याचे बोपखोलला उद्घाटन

पिंपळनेर : येथील कर्मवीर आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालयाच्या रासेयो विभागातर्फे दत्तक गाव बोपखोल (ता. साक्री) येथे कवयित्री बहिणाबाई ग्रामवाचन कट्ट्याचे उद्घाटन झाले. सरपंच सुमित्रा राऊत अध्यक्षस्थानी होत्या. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, तलाठी दिलीप चव्हाण, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक पाव्या गावित, अंगणवाडीसेविका सुनीता माळचे प्रमुख पाहुण्या होत्या. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रदीप सावळे यांनी करून दिला. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. चंद्रकांत घरटे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सावळे यांनी आभार मानले. प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाट, जितेंद्र कुवर, वेडू अहिरराव, शिवाजी कुवर, रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी रासेयो स्वयंसेवक उमेश आहिरे, विष्णू भारूड, शिवा जगताप, राकेश गायकवाड यांनी प्रयत्न केले.

## Outcomes: 02

As per the call of the Maharashtra Government to prevent Corona infection, the National Service Scheme volunteers of our college spent the night at Shelbari, Nashik border in Dhule District from March to May 2020. Also performed night duty for 18 days in Balhane village Red Zone in Taluka Sakri, District Dhule. At Pimpalner also, some volunteers did an important job of preventing Corona infection by patrolling at night. These volunteers were appreciated as **CORONA Warriors by Superintendent of Police, Dhule (Maharashtra)**

## Outcomes: 02

Three NCC cadet Mr. Tushar Dahite, Mr. Ritesh Gharate and Mr. Prashant Gharate worked as CORONA WARRIER during COVID-19 Lockdown and helped the people in their village. They were engaged in creating awareness amongst the society to protect against the havoc.



**Mr. Tushar Dahite**




**Mr. Ritesh Gharate**



**Mr. Prashant Gharate**

# Outcomes: 02

These volunteers were appreciated as **CORONA Warriors by Superintendent of Police, Dhule (Maharashtra)**










**Mr. Tushar Dahite**

**Mr. Ritesh Gharate**

**Mr. Prashant Gharate**

## Outcomes: 03

The residents of Kolhapur and Sangli districts of Maharashtra state faced terrible floods in 2019. There was immense loss of life and money at that place due to flood. In the disaster management and rehabilitation camp organized by K. B. C. N. M. University, Jalgaon to deal with these water crises and to help the flood victims. Two NSS Volunteers of our college **Mr. Pawar Rahul** and **Mr,. Chaure Yogesh** went to the flood affected areas of Khandala and Nanganur in Gadhinglaj taluka of Kolhapur district and helped the flood victims. A resolution of congratulating them on behalf of the university for their work was passed in the Senate meeting of K. B. C. N. M. University, Jalgaon.

## Outcomes: 03

**Mr. Rahul Pawar** and **Mr. Yogesh Chaure** (NSS) were successfully participated in Disaster Management and Rehabilitation camp at Khandal-Nangnur of Kolhapur District.




**Mr. Rahul Pawar**



**Mr. Yogesh Chaure**

**Mr. Rahul Pawar** and **Mr. Yogesh Chaure** (NSS) were honoured by KBCMNU, Jalgaon on their successful participation in Disaster Management and Rehabilitation camp at Khandal-Nangnur of Kolhapur District.



॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

जा.क्र.कबचौउमवि/२/अधिसभा कार्यवाही/ 246 /२०१९ — दि. २३.१०.२०१९.

प्रति,
श्री. पवार राहूल अर्जुन
द्वि.आ.मा. पाटील कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय,
पिंपळनेर.

**विषय :-** आपत्ती व्यवस्थापन आणि पुर्नवसन शिबिरात सहभाग घेऊन पूरग्रस्तांना केलेल्या मदतीबाबत.

महोदय,

मागील महिन्यात महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील नागरिकांना भयंकर जलप्रलयास सामोरे जावे लागले. त्या ठिकाणी अपरिमीत वित्तीय व वित्त हानी झाली. या जलसंकटाचा सामना करण्यासाठी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना एकका अंतर्गत पूरग्रस्तांना मदतीसाठी दि. २९ ऑगस्ट, २०१९ ते दि. ०६ सप्टेंबर, २०१९ या कालावधीत आयोजित आपत्ती व्यवस्थापन आणि पुर्नवसन शिबिरात आपण सहभागी होवून कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यातील खण्दाळ व नांगनूर या पूरग्रस्त गावात श्रमदान केले. यावेळी आपण पडलेल्या घरातील साफसफाई करण्यासह स्थानिक पूरग्रस्तांना जिवनावश्यक व शालेय वस्तुंचे वाटपही केले. यामुळे आपणास सेवेची अनुभूती मिळाली, त्याबद्दल आपले अभिनंदन करण्यात यावे असा ठराव विद्यापीठाच्या दि. २५ सप्टेंबर, २०१९ रोजी झालेल्या मा. अधिसभेच्या सभेत पारित करण्यात आलेला आहे.


उपरोक्त अनुषंगाने मी विद्यापीठाच्या अधिसभेच्या वतीने व विद्यापीठाचा कुलसचिव या नात्याने आपले मन:पूर्वक अभिनंदन करतो.

आपला विश्वासू,
(भ. भा. पाटील)
कुलसचिव

**प्रत माहितीसाठी.**
१. संबंधित महाविद्यालयाचे मा. प्राचार्य.
२. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, कबचौउमवि., जळगाव.
३. मा. कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
४. सहा. कुलसचिव, प्रशासन विभाग, कबचौउमवि., जळगाव.

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७-२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७-२२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429
Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in

**Mr. Rahul Pawar**



॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

जा.क्र.कबचौउमवि/२/अधिसभा कार्यवाही/ 246 /२०१९ — दि. २३.१०.२०१९.

प्रति,
श्री. चौरे योगेश गोविंद,
द्वि.आ.मा. पाटील कला, वाणिज्य,
व विज्ञान महाविद्यालय,
पिंपळनेर

**विषय :-** आपत्ती व्यवस्थापन आणि पुर्नवसन शिबिरात सहभाग घेऊन पूरग्रस्तांना केलेल्या मदतीबाबत.

महोदय,

मागील महिन्यात महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील नागरिकांना भयंकर जलप्रलयास सामोरे जावे लागले. त्या ठिकाणी अपरिमीत वित्तीय व वित्त हानी झाली. या जलसंकटाचा सामना करण्यासाठी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना एकका अंतर्गत पूरग्रस्तांना मदतीसाठी दि. २९ ऑगस्ट, २०१९ ते दि. ०६ सप्टेंबर, २०१९ या कालावधीत आयोजित आपत्ती व्यवस्थापन आणि पुर्नवसन शिबिरात आपण सहभागी होवून कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यातील खण्दाळ व नांगनूर या पूरग्रस्त गावात श्रमदान केले. यावेळी आपण पडलेल्या घरातील साफसफाई करण्यासह स्थानिक पूरग्रस्तांना जिवनावश्यक व शालेय वस्तुंचे वाटपही केले. यामुळे आपणास सेवेची अनुभूती मिळाली, त्याबद्दल आपले अभिनंदन करण्यात यावे असा ठराव विद्यापीठाच्या दि. २५ सप्टेंबर, २०१९ रोजी झालेल्या मा. अधिसभेच्या सभेत पारित करण्यात आलेला आहे.

उपरोक्त अनुषंगाने मी विद्यापीठाच्या अधिसभेच्या वतीने व विद्यापीठाचा कुलसचिव या नात्याने आपले मन:पूर्वक अभिनंदन करतो.

आपला विश्वासू,
(भ. भा. पाटील)
कुलसचिव

**प्रत माहितीसाठी.**
१. संबंधित महाविद्यालयाचे मा. प्राचार्य.
२. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, कबचौउमवि., जळगाव.
३. मा. कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
४. सहा. कुलसचिव, प्रशासन विभाग, कबचौउमवि., जळगाव.

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७-२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७-२२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429
Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in

**Mr. Yogesh Chaure**

# Outcomes: 04



Mr. Pawan Nikum

Graduate from Commerce

Ex-Volunteer NSS

Actively Participated in various NSS activities

## Outcomes: 04

**Mr. Pawan Nikum** (NSS) was participated in National Integration Camp at ARKA Jain University, Tatanagr, Jamshedpur, Jharkhand.



# वरिष्ठ महाविद्यालय पिंपळनेर येथील रासेयो स्वयंसेवक राष्ट्रीय शिबिरासाठी झारखंडला रवाना

साक्री (अनिल देसले दै. धुळे दवंडी): कर्म आ मा पाटील कला वाणिज्य व के अण्णासाहेब विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय पिंपळनेर, येथील राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी पवन हिरालाल निकुम हा कबचौ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव मार्फत आरका जैन विद्यापीठ जमशेदपूर टाटानगर झारखंड येथे दिनांक १८ ते २४ मे २०२२ दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरास रवाना झाला.

आरका जैन विद्यापीठ, जमशेदपूर (टाटानगर) झारखंड येथे दिनांक १८ ते २४ मे २०२२ दरम्यान राष्ट्रीय स्तरावर आयोजित होणाऱ्या *राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी* प्रत्येक विद्यापीठातून सहा विद्यार्थी आणि सहा विद्यार्थ्यांनी असे एका विद्यापीठाचे बारा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यात विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या कला गुणांच्या आधारावर सर्वोत्तम विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली .त्यात कबचौ, उमवि चे कुलगुरु मा डॉ माहेश्वरी व रासेयो संचालक मा डॉ सचिन नांद्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. तसेच आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस टी सोनवणे, रासेयो एककाचे कार्यक्रम अधिकारी प्रा चंद्रकांत घरटे, इतिहास विभागाचे प्रा प्रदीप सावळे व रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा नांद्रे यांनी सदर विद्यार्थ्याला मार्गदर्शन केले व शिबिरास जाण्यासाठी शुभेच्छा दिल्या. सदर विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय एकात्मता शिबिरास निवड झाल्याबद्दल पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा बाळासाहेब शिंदे तसेच सर्व संचालक मंडळ यांच्याकडून कौतुक करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ पेटारे,डॉ खोडके, प्रा राऊत, डॉ शिरसाठ डॉ बी सी मोरे, प्रा कदम प्रा तोरवणे यांनी पवन नीकुम ला शिबिरास जाण्यासाठी शुभेच्छा दिल्या.पवन हा अत्यंत गरीब परिस्थितीतून शिक्षण घेत आहे. अशा विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावरील शिबिरासाठी निवड झाल्यामुळे पिंपळनेर ग्रामस्थ व परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



ARKA JAIN University
Jharkhand (Jamshedpur)

आज़ादी का अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**GOVERNMENT OF INDIA**

Ministry of Youth Affairs and Sports, New Delhi
**NATIONAL INTEGRATION CAMP - 2022**

Organised by
REGIONAL DIRECTORATE OF NSS, PATNA

**Certificate of Participation**


This is to certify that, Dr/Mr/Mrs/Mr Nikum Pavan Hiralal of K.B.C.N.M.U. Jalgaon College / University has successfully participated in the National Integration Camp 2022 sponsored by Government of India, Ministry of Youth Affairs & Sports, New Delhi organised by The Regional Directorate of NSS, Patna in collaboration with Arka Jain University, Jamshedpur (Jharkhand) held from 18th to 24th May 2022.

| | | | |
|---|---|---|---|
| Programme Coordinator, NSS<br>Arka Jain University, Jharkhand | Dean Student Welfare<br>Arka Jain University, Jharkhand | Vice Chancellor<br>Arka Jain University, Jharkhand | Regional Director<br>Regional Directorate of NSS, Patna |

## Outcomes: 04

**Mr. Pawan Nikum** (NSS) was honored by **Hon. V. C. Prof. V. L. Maheshwari Sir (K.B.C.N.M.U., Jalgaon)** on his participation in National Integration Camp at ARKA Jain University, Tatanagr, Jamshedpur, Jharkhand.



## Outcomes: 05

**Miss. Chandrakala Gavit** (NSS) was honored by **Hon. V. C. Prof. V. L. Mahehwari Sir KBCNMU, Jalgaon** on her successful expedition of Mount Everest.



**Miss. Chandrakala Gavit**

**Graduate from Arts faculty**

**Ex-NSS Volunteer**

**Miss. Chandrakala Gavit** (NSS) climbing on Mount Everest.








दिव्य मराठी

धुळे सिटी 12-01-2021



14596 जिल्ह्यात एकूण पॉझिटिव्ह रुग्णसंख्या

14060 कोरोनामुक्त

13 आजचे पॉझिटिव्ह

388 एकूण मृत्यू

दिव्य मराठी दिव्य सिटी

महाराष्ट्राचे एकमेव स्वतंत्र वृत्तपत्र

धुळे, मंगळवार, १२ जानेवारी २०२१ | मार्गशीर्ष कृ.१४, शके १९४२


# बुटाने दिला त्रास पण प्रचंड आत्मविश्वास, जिद्दीच्या जोरावर केले एव्हरेस्ट सर

**युवा दिन विशेष**

गणेश सूर्यवंशी | धुळे

**गोठणबिंदूकडे सरकलेली थंडी, बफाळ प्रदेश अन् अंधार चिरत पहाटे अभिमानाने एव्हरेस्टवर फडकवलेला तिरंगा. हा क्षण निश्चितच आयुष्यभर स्मरणात राहील; परंतु एव्हरेस्टची चढाई साधी नव्हती. एव्हरेस्ट सर करताना बुटाने दगा दिला. त्यानंतरही वेदना सहन करून एव्हरेस्ट सर केला. जीवघेण्या मशरूम रॉकपासून एव्हरेस्टवर आत्मविश्वासाने चढाई केल्याचा अनुभव युवा दिनाच्या पूर्वसंध्येला चंद्रकला गावितने सांगितला.**

जिल्ह्यातील आदिवासीबहुल पिंपळनेर परिसरातील मोहगाव हे छोटेसे गाव आहे. या गावातील चंद्रकला उत्तम गावित या १८ वर्षाच्या युवतीची आदिवासी विकास प्रकल्पाच्या माध्यमातून एव्हरेस्ट सर करण्यासाठी निवड झाली होती. खडतर प्रशिक्षण आणि निवड चाचणीनंतर २०७ पैकी केवळ ९ मुली एव्हरेस्टच्या चढाईसाठी निवडल्या गेल्या. त्यात चंद्रकलाचा समावेश होता. भारत-नेपाळ सीमेवरील एव्हरेस्ट बेसकॅम्पपासून १७ मे रोजी चंद्रकलाने वरिष्ठ व सहकाऱ्यांच्या मदतीने शिखराच्या दिशेने वाटचाल सुरू केली. नेपाळ येथील कर्मा शेरपा तिचे गाइड होते. तुफानी बर्फ वितळण्याच्या भीतीने तर रात्री बर्फाळ वादळाच्या भीतीने टेंटमध्ये मुक्काम केल्यानंतर पहाटे पुन्हा शिखरच्या दिशेने प्रवास सुरू होत होता. या दरम्यान पुरेसे पाणी, सूप पोटाला आधार देणारे ठरले; परंतु शिखराच्या दिशेने सुरू असलेल्या प्रवासात बुटाचा त्रास जाणवू लागला. उबदार जाड मोजे अन् गुडघ्यापर्यंत असलेले अत्याधुनिक बूट पायात होते. या बुटाची गुडघ्याजवळ असलेली किनार चालताना त्रासदायक ठरली. त्यामुळे चालता येत नव्हते. शिवाय काहीअंशी वेदना सुरू होत्या; परंतु काही झाले तरी एव्हरेस्ट सर करायचाच ही जिद्द नव्या ऊर्जेने उभारी देत होती. शिखराच्या दिशेने प्रवास करताना अत्यंत धोकेदायक मानला जाणारा मशरूम रॉक लागला. या ठिकाणी अनेक पर्वतारोहींचा दुर्दैवाने मृत्यू झाला आहे. बुटामुळे चालणे अवघड झाले होते. ही बाब गाइड कर्मा शेरपा यांना सांगितली होती. त्यांनी परिस्थिती पाहून तुला चालणे कठीण होईल त्यामुळे थांब, असा सल्लाही दिला होता; परंतु माझा आत्मविश्वास पाहून एव्हरेस्ट सर करण्यासाठी त्यांनी विरोध केला नाही. त्यामुळेच २३ मे २०१८ च्या पहाटे ४ वाजून २० मिनिटांनी एव्हरेस्ट सर केला. त्या वेळी आनंदाश्रू ओघळले अन् अभिमानाने तिरंगा फडकवला.

## गावाचा डोंगर ते हिमशिखर

गावापासून जवळ शेंदवड भवानी येथे डोंगर व देऊळ आहे. त्यामुळे लहानपणापासून डोंगररांगेत जाणे होत होते. त्यातूनच गिर्यारोहणाची आवड निर्माण झाली. एव्हरेस्ट मोहिमेसाठी निवड झाल्यावर वर्धा येथे ५ दिवस, हैदराबादला ४, दार्जिलिंगला २८ दिवस, सिक्कीमला एक महिना अन् लेह लदाख येथे एक महिना खडतर सराव केला. दिवसभर किमान ६ तास सराव सुरू असायचा, असेही चंद्रकलाने सांगितले.



एव्हरेस्ट सर केल्यावर तिरंगा फडकवताना चंद्रकला

**प्रेरणा :** चंद्रकला गावितने सांगितले की, आठवीत असताना एव्हरेस्टवर एका धडा होता. तो शिकवताना शिक्षिका पगारे यांना मी एव्हरेस्टबद्दल विचारले होते. मॅडम आपण जाऊ शकतो का एव्हरेस्टवर ? त्यावेळी पगारे मॅडम यांनी तेवढ्याच आत्मविश्वासाने का नाही, मनोबल उच्च असेल तर सर्व शक्य आहे, असे सांगून आत्मविश्वास वाढवला होता, असे चंद्रकलाने सांगितले.

## आदर्श : आई-वडीलच

जीवनात आई-वडील हेच आदर्श आहेत. त्यांचा नावलौकिक झाला पाहिजे ही इच्छा होती. सराव व प्रत्यक्ष एव्हरेस्ट सर करताना आई-वडिलांचा चेहरा समोर होता. त्यांनी आजवर केलेले कष्ट सार्थकी ठरवण्याची ती वेळ होती. त्यांच्या कष्टातून एव्हरेस्ट सर करण्यासाठी ऊर्जा मिळाल्याचे चंद्रकला गावितने सांगितले.

## कष्ट करा : प्रत्येकात असते उमेद

*प्रत्येक तरुणात काही तरी करण्याची उमेद असते. आवड, छंद ओळखता आला पाहिजे. शिवाय नजरेसमोर असलेले ध्येय गाठण्यासाठी खडतर कष्ट केले पाहिजे. ध्येय निश्चित करून कष्टाच्या जोरावर ते प्राप्त करण्यासाठी युवकांनी प्रयत्न करावेत.*

**-चंद्रकला गावित,** गिर्यारोहक

लोकमत

**मान्यवरांकडून रोख बक्षिसे :** इंदवे या मूळ गावी थाटात पार पडला सोहळा, पंचक्रोशीतून नागरिकांची उपस्थिती

# माऊंट एव्हरेस्ट सर करणाऱ्या चंद्रकलाचा नागरी सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**निजामपूर :** आदिवासी मुलामुलींमध्ये चिकाटी असते. त्यांना संधी मिळाली तर ते जिद्दीने प्रयत्न करुन यश मिळवितात, असे मत जगातील सर्वात उंच पर्वत माऊंट एव्हरेस्ट शिखर सर केलेल्या इंदवे येथील आश्रमशाळेतील विद्यार्थिनी चंद्रकला गावीत हिने जाहीर नागरी सत्कारास उत्तर देताना व्यक्त केले.

इंदवे येथे शनिवारी शाळा प्रांगणात उभारलेल्या भव्य शामियान्यात राज्याचे पर्यटन आणि अन्न व औषध खात्याचे मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेत हा सत्कार सोहळा थाटात पार पडला. राज्य सरकारने चंद्रकलाच्या या यशाच्या गौरवार्थ विशेष बाब म्हणून २५ लाख रुपये रोख पुरस्कारासह सन्मानचिन्ह प्रदान करण्याचा निर्णय घेतल्याचे मंत्री रावल यांनी यावेळी सांगितले. आश्रमशाळा संस्थेने दिलेला २५ हजारांचा धनादेश मंत्री रावल यांच्याहस्ते तिला प्रदान करण्यात आला. नंदुरबार येथील भरत गावीत यांनीही तिचा सत्कार करून पाच हजारांचा धनादेश दिला. प्रास्ताविक आश्रम शाळेतील शिक्षक खैरनार यांनी केले.



चंद्रकला गावीत हिचा पुरस्कार देवून गौरव करताना जयकुमार रावल. समवेत मंजुळा गावीत, बबनराव चौधरी, प्रांतिक सदस्य सुरेश रामराव पाटील, सुभाष देवरे, कामराज निकम, डॉ.तुळशीराम गावीत, मंजुळा गावीत, वसंतराव बच्छाव, संजय अहिरराव, बाबा पठाण, पोपटराव सोनवणे, आशा सोनवणे आदी.

सत्कार प्रसंगी महुपाडा (ता.साक्री) येथील तिचे वडील उत्तम गावीत व आई व्यासपीठावर उपस्थित होते. चंद्रकला हिने मनोगत व्यक्त करताना तिचे शिखर चढतांनाचे चित्तथरारक अनुभव कथन केले. त्यामुळे ती मोहीम किती असामान्य आणि ती साहसी असल्याचे उपस्थितांना जाणवले.

या समारंभास भाजप जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, प्रांतिक सदस्य सुरेश रामराव पाटील, सुभाष देवरे, कामराज निकम, डॉ.तुळशीराम गावीत, मंजुळा गावीत, वसंतराव बच्छाव, संजय अहिरराव, बाबा पठाण, संस्था अध्यक्ष पोपटराव सोनवणे, आशा सोनवणे, विक्रम पाटील, चंद्रकला सिसोदिया, अरुण धोबी, अक्षय सोनवणे, मोहन सूर्यवंशी, चंदूलाल जाधव, मोतीलाल पोतदार, राजेंद्र सावंत, लियाकत सैय्यद, शिवलाल ठाकरे, दगा शेलार, संजय साबळे, महेंद्र देसले, दोंडाईचा कृ उ बा समिती सभापती नारायण पाटील, संभाजी पगारे, दिनकरराव देवरे, आदिवासी विकास विभागाचे आव्हाड, प्रकल्प अधिकारी टी.के. ठाकरे, एस. एस. काकड होते.

लोकांनी भरलेल्या मंडपात इंदवे गावासह पंचक्रोशीतील दुसाणे, आखाडे, ऐचाळे, पन्हाळीपाडा, वालव्हे, शेवाळी, भोरटीपाडा, म्हसाळे, धवळीविहीर, खुडाणे, कढरे, बळसाणे, निजामपूर सह अनेक गावांचे लोक उपस्थित होते. आदिवासी विद्यार्थ्यां समोर मोठे ध्येय ठेवल्यास ते ध्येय गाठण्यासाठी सर्वतोपरी कठोर परिश्रम करतील आणि त्यांनी अन्य विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण करावा या उद्देशाने आदिवसी विकास विभागामार्फत विशेष प्रकल्प राबविण्याचे निश्चित करण्यात आले.

प्राचार्य प्रवीण ठाकरे, मुख्याध्यापक गिरीश भामरे, अधिक्षक प्रवीण सोनवणे, क्रीडाशिक्षक भूषण सोनवणे, मंगेश ठाकरे, जे.जे.बागुल, प्रतिभा पाटील, लीना ठाकरे, रेशमा कोकणी, जयश्री सोनवणे व सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले

दैनिक दिव्य मराठी

14-Nov-2019
धुळे सिटी Page 4



# कधीही स्वतःला कमी लेखू नका; मोठे ध्येय बाळगा : एव्हरेस्टवीर चंद्रकला

**बालदिन विशेष...**

रवींद्र देवरे | साक्री

एव्हरेस्ट शिखर सर करण्याचा संकल्प केला होता. हा संकल्प पार पाडताना कितीही कठीण आव्हाने समोर आली तरी मागे हटणार नाही, असे ठरविले होते. खडतर प्रशिक्षण, कुटुंबाचे पाठबळ, आश्रमशाळेतील शिक्षक व मिशन शौर्य टीम मधील सदस्यांचे मार्गदर्शन यामुळे एव्हरेस्ट शिखर सर करू शकले. यश-अपयशाचा विचार न करता जीवनात निश्चित केलेले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. तसेच कधीही स्वतःला कमी लेखू नये. जीवनात यशस्वी होण्यासाठी मोठे ध्येय बाळगणे महत्वाचे असते. त्यातूनच तुम्ही जगासमोर स्वतःची नवीन ओळख निर्माण करू शकतात, असे मत एव्हरेस्ट वीर चंद्रकला गावित हिने बाल दिनाच्या पूर्वसंध्येला दिव्य मराठीशी बोलताना व्यक्त केले. चंद्रकलाला आयपीएस अधिकारी व्हायचे असून त्यासाठी तिने आतापासून तयारी सुरू केली आहे.

साक्री तालुक्यातील मोहुपाडा गावात राहणाऱ्या आदिवासी समाजातील चंद्रकला गावितने एव्हरेस्ट शिखर सर केले. तिची आई कमलाबाई व वडील उत्तम गावित हे शेती करून कुटुंबाची उपजीविका भागवतात. गरिबी व शिक्षण कमी असूनही कमलाबाई गावित व उत्तम गावित या दाम्पत्याने मुलांना उच्चशिक्षण देण्याचे स्वप्न बाळगले आहे. या दाम्पत्याला एक मुलगा व दोन मुली असून झोपडीवजा घरात ते राहतात. चंद्रकला गावित इंदवे येथील शासकीय आश्रमशाळेत शिकते. तिने धावण्याच्या शर्यतीत तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर पुरस्कार मिळवले. त्यामुळे आश्रमशाळेचे प्राचार्य प्रवीण ठाकरे, व्यवस्थापक पी. डी. सोनवणे, क्रीडाशिक्षक मंगेश ठाकरे, प्रतिभा पाटील व भूषण सोनवणे यांनी तिच्या नावाची शिफारस आदिवासी विकास विभागाकडून राबवण्यात आलेल्या मिशन शौर्य या एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या मोहिमेसाठी केली. या विषयी चंद्रकला गावितने सांगितले की, मोहिमेंतर्गत राज्यातील शासकीय व अनुदानित आदिवासी आश्रमशाळेतील शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त व मानसिकदृष्ट्या कणखर अशा २०७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. वर्षभर वर्धा, हैदराबाद, सिक्किम, कवळज, दार्जीलिंग, लेह व लडाख अशा विविध ठिकाणी प्रशिक्षण देण्यात आले. यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या ११ विद्यार्थ्यांची निवड एव्हरेस्ट शिखर सर करण्यासाठी झाली. त्यात माझा समावेश होता. अकरा विद्यार्थ्यांपैकी नऊ विद्यार्थ्यांनी २३ मे २०१९ रोजी एव्हरेस्ट शिखर सर करण्याची मोहीम पूर्ण केली. एव्हरेस्ट सर करण्याची मोहीम वाटते तेवढी सोपी नव्हती. देशातील विविध ठिकाणी खडतर प्रशिक्षण झाले. शारीरिक व मानसिक तयारी करून घेण्यात आली. शून्य डिग्री पेक्षा कमी तापमानात शिखर सर करताना ठराविक उंचीवर गेल्यानंतर ऑक्सिजन मिळणे कठीण असते. त्यामुळे श्वासही घेता येत नाही. या परिस्थितीत एव्हरेस्ट शिखर कसे गाठायचे, याचे प्रशिक्षण देण्यात आले. अनेक प्रशिक्षणार्थी मनाने खचले. मोजक्याच प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पूर्ण करता आले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर खरी लढाई सुरू झाली. एव्हरेस्ट शिखरावर चढाई करताना अनेक अडचणी आल्या. हा प्रवास खूप अवघड होता. मात्र, विश्वास आणि ध्येयामुळे एव्हरेस्ट शिखरावर विजयी चढाई केली. एव्हरेस्ट शिखरावर विजयाचा झेंडा रोवला तो सुवर्णक्षण होता, असेही तिने स्पष्ट केले. चंद्रकलाला आयपीएस अधिकारी व्हायचे आहे. त्यासाठी तिने पदवीचे शिक्षण पूर्ण करून केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्याचा निश्चय केला आहे. प्रशासकीय सेवेत दाखल होऊन जनतेची सेवा करण्याचे तिचे उद्दिष्ट आहे.

**परिस्थितीवर मात करा....**

आदिवासी समाजातील मुलामुलींनी शिक्षण घेताना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची हिम्मत ठेवावी. आईवडिलांचे पाठबळ आणि आशीर्वादामुळे यश मिळाले. त्याचबरोबर आदिवासी विकास विभाग, राज्य शासन व केंद्र शासन प्रशिक्षण देणारे सर्व शिक्षक, अधिकारी आणि या मोहिमेतील इतर सहकारी या सर्वांचे सहकार्य लाभले. त्यामुळे मी हे यश प्राप्त करू शकले, असेही चंद्रकलाने सांगितले.





एव्हरेस्ट शिखर सर करणाऱ्या चंद्रकला गावितचा सत्कार करताना मान्यवर.

# 'माऊंट एव्हरेस्ट'वीर चंद्रकलाचा सत्कार

शहादा, ता. २० : पिंपळनेर येथील कर्मवीर आ. मा. पाटील महाविद्यालयाची विद्यार्थिनी चंद्रकला गावित हिने २०१९ मध्ये जगातील सर्वांत उंच शिखर एव्हरेस्ट सर केले होते. ती या वेळी उपस्थित होती. कार्यक्रमात चंद्रकला गावित हिचा धाडसाचे कौतुक करीत मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

# ‘माउंट एव्हरेस्ट’ पाहून मिळाली ध्येय गाठण्याची प्रेरणा

## अठराव्या वर्षी ‘एव्हरेस्ट’ सर करणारी गिर्यारोहक चंद्रकला गावितकडून थरारक अनुभव कथन

**सम्राट महाजन : सकाळ वृत्तसेवा**

**विद्याश्रम (शहादा), ता. २० :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठस्तरीय आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव- २०१९ मध्ये अवघ्या अठरा वर्षांची असताना माउंट एव्हरेस्ट विजेती गिर्यारोहक चंद्रकला गावित युवारंग महोत्सवात उपस्थित होती. या यशाबद्दल युवारंगात सर्वच जण तिचे कौतुक करत होते. या वेळी 'सकाळ'नेही तिची भेट घेत माउंट एव्हरेस्ट मोहिमेविषयी तिच्याकडून जाणून घेतले. तिच्याशी चर्चा केली.

**प्रश्न : माउंट एव्हरेस्टवर जावेसे का वाटले?**

चंद्रकला गावित : मला सुरवातीपासूनच डोंगरावर चढाई करायला आवडायचे. मी



चंद्रकला गावित

आठवीत असताना आमच्या शिक्षिकेला माउंट एव्हरेस्टवर जाण्याबाबत विचारले. तेव्हा त्यांनी मला स्पष्ट शब्दात नकार दिला व त्याठिकाणी जाणे अशक्य असल्याचे सांगितले. त्यावेळी माझ्यातील सुप्त इच्छेचे धाडसात रूपांतर झाले व भविष्यात त्याठिकाणी जायचेच, अशी खूणगाठ मी बांधली.

**प्रश्न : माउंट एव्हरेस्टवर जाण्याची संधी कशी मिळाली?**

चंद्रकला : माझ्या इच्छाशक्तीला महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या 'मिशन शौर्य' या योजनेची साथ मिळाली. त्यामुळे मी माझे ध्येय गाठू शकले, असे मला वाटते. या



माउंट एव्हरेस्ट मोहीम यशस्वी केलेल्या विद्यार्थ्यांसह चंद्रकला गावित. (संग्रहित छायाचित्र)

मोहिमेचा सर्व खर्च आदिवासी विकास विभागाच्या धुळे प्रकल्प कार्यालयांतर्गत करण्यात आला होता.

**प्रश्न : या मोहिमेत किती मुले सहभागी झाली होती?**

चंद्रकला : या मोहिमेत धुळ्याचे ३७, तर राज्यातील एकूण २०३ मुले-मुली सहभागी झाली होतेती. त्यापैकी काही पहिल्या टप्प्यात, तर काही दुसऱ्या टप्प्यात कमी होत शेवटी फक्त ११ मुले-मुली या मोहिमेत सहभागी झाली. त्यापैकी मी धुळ्याची एकुलती एक मुलगी माउंट एव्हरेस्टवर जाणाऱ्या मोहिमेत होती.

**प्रश्न : मोहिमेसाठी कसा सराव केला?**

चंद्रकला : या मोहिमेसाठी मी नऊ महिने कठोर व न चुकता सराव केला. यात पहिले पाच दिवसांचे प्रशिक्षण वर्धा येथे, दुसरे पाच दिवसांचे हैदराबाद येथे, दार्जिलिंग येथे २८ दिवसांचे, तर त्यानंतर नागपूरला सराव केला. यादरम्यान मी शारीरिक क्षमता, आत्मविश्वास, आत्ममनोबल वाढीसाठी प्रयत्न केले. तसेच नियमितपणे व्यायाम, योगासन केली व माउंट एव्हरेस्टच्या मोहिमेसाठी सज्ज झाले.

**प्रश्न : माउंट एव्हरेस्टवरील एखादा अविस्मरणीय अनुभव कोणता?**

चंद्रकला : माउंट एव्हरेस्टवरील मोहिमेत एकदा अचानक माझ्या हातातून कॅरॉबिनर खाली पडले होते. त्यामुळे मीही खाली पडले. त्या क्षणाला मला काय करावे, हेच सुचत नव्हते. माउंट एव्हरेस्टवरील तो अनुभव फारच थरारक होता आणि तो मला नेहमी आठवणीत राहील.

**प्रश्न : मोहीम यशस्वी केल्यानंतरचे अनुभव काय?**

चंद्रकला : मोहीम यशस्वी झाल्यानंतर मला खूप आनंद झाला. त्यानंतर ठिकठिकाणी माझा सत्कार होऊ लागला. मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूरला सत्कार केला. त्या वेळी माझे आई-वडीलदेखील सोबत होते. त्या वेळी खूप आनंद झाला होता. एखादी ग्रामीण भागातील मुलगीही एखाद्या मोठ्या मोहिमेत यशस्वी होऊ शकते, हे मी दाखवून दिले व त्याचा मला मनस्वी आनंद मिळतो.

**प्रश्न : युवारंग महोत्सवानिमित्त युवकांना काय संदेश देणार?**

चंद्रकला : युवक-युवतींनी परिस्थिती कशीही असो न डगमगता धाडसाने परिस्थितीचा सामना करावा. ध्येय गाठण्यासाठी मेहनत करावी व संधीचे सोने करावे, एवढेच मी म्हणेन.

सकाळ

# माउंट एव्हरेस्टच काय जगही जिंकू शकतो!

## माउंट एव्हरेस्टकन्या चंद्रकला गावितचा आत्मविश्वास

**सकाळ वृत्तसेवा**

वार्सा, ता. २१ : कर्मवीर आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालयाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर दत्तक गाव बोपखेल (ता. साक्री) येथे सुरू आहे. शिबिराचा सोमवारचा दुसरा दिवस होता. या वेळी शिबिरातील सर्व स्वयंसेवकांनी शिबिरातील दैनंदिन कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदविला. दुपारचे व्याख्यान दोन सत्रांत झाले. पहिले व्याख्यान महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक के. आर. राऊत यांचे झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना कृषी व ग्रामीण विकासासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जागृतीपर प्रबोधन केले.



बोपखेल (ता. साक्री) : श्रमसंस्कार शिबिरात बोलताना माउंट एव्हरेस्टकन्या चंद्रकला गावित. शेजारी उपस्थित प्राध्यापकवृंद.

त्यानंतर व्याख्यानाच्या दुसऱ्या सत्रात महाविद्यालयाची द्वितीय वर्ष कला या वर्गात शिक्षण घेणारी विद्यार्थिनी कुमारी चंद्रकला उत्तम गावित हिने अतिशय कमी वयात माउंट एव्हरेस्ट शिखर गाठले. त्याची यशोगाथा मुलांसमोर मांडली. तिने अक्षरशः विद्यार्थ्यांच्या अंगावर शहारे उभे राहतील अशी आपली कर्तृत्वाची गाथा राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या मनावर उमटवली व उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये कर्तृत्व, उत्साह, एक नवा जोश निर्माण केला. माउंट एव्हरेस्ट सर करतानाच्या असलेल्या अतिशय खडतर प्रवासाचे वर्णन करताना चंद्रकला म्हणाली, की आपल्या मनात एखादे यश मिळविण्यासाठीची प्रबळ इच्छाशक्ती असली की माउंट एव्हरेस्टच काय तर माणूस संपूर्ण जग जिंकू शकतो. माउंट एव्हरेस्ट सर करतानाचा प्रवास म्हणजे जणू काही प्रत्यक्षात जिवंतपणी मृत्यूचाच अनुभव होता. आजूबाजूला पर्वतराजीत शिखर चढणारे गिर्यारोहक जशा अवस्थेत असतील तशाच अवस्थेत यांचा मृत्यू होऊन पडलेली मृतदेह जणू काही ती माणसे म्हणजे जिवंत पुतळे आपल्यासमोर उभे आहेत की काय याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. तिची उतरतानाची झालेली दमछाक म्हणजे जणू काही प्रत्यक्षात मृत्यूवर मिळविलेला विजय होता. समोर मृत्यू दिसत असतानादेखील तिने फक्त आपला देश, आपला जिल्हा, तालुका, आपले गाव यांची मान कशी उंचावेल हाच ध्यास घेतला होता. तिला एक प्रकारे मृत्यूवर विजय मिळवून एव्हरेस्ट शिखर गाठण्याचा बहुमान अत्यंत कमी वयात मिळाला. चंद्रकला अतिशय गरीब कुटुंबात जन्माला येऊनसुद्धा आपल्या आई-वडिलांची नव्हे तर आपल्या देशाची मान उंचावणारी एव्हरेस्टकन्याच म्हणावी लागेल.